महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स् इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
■ इलेक्ट्रिकल सुपरवायझर ■ ऑटोमोबाईल टेक्निशियन
■ इलेक्ट्रिकल वायरमन ■ मोटार वायडिंग
■ टू-व्हीलर मेकॅनिक ■ फोर व्हीलर मेकॅनिक
■ A.C. मेकॅनिक ■ वेल्डर / प्लंबर
■ कॉम्प्युटर ऑपरेटर ■ कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ६४ वा | शुक्रवार, दि. २६ सप्टेंबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटस्‌ॲप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...
501% रिझल्ट

# मुख्यमंत्री साहेब शेतकऱ्यांच्या जखमांवर मीठ चोळू नका !

## पंजाब सरकारप्रमाणे हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत मिळावी, शेतकऱ्यांची मागणी



- अतिवृष्टीच्या झळा अन सत्ताधाऱ्यांचा अजब संवाद !
- नेते फिरले, पण शेतकऱ्याच्या डोळ्यांतील आसवं पाहिली का?
- घोषणांचा पाऊस, मदतीचा अभाव - बळीराजा गप्प का बसणार?
- राजकारण नव्हे, हक्क मागतोय बळीराजा !
- सत्तेच्या मंचावरून शेतकऱ्याचा अपमान !



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्री हे बुधवारपासून (ता. 24 सप्टेंबर) अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेत आहेत. गेली महिना-दीड महिन्यापासून होत असलेल्या अतिवृष्टीमुळे बळीराजा सर्वकाही हरवून बसला आहे, त्यामुळे महिनाभरापासून त्याचा मनात दबून राहिलेल्या संतापाचा उद्रेक मंत्र्यांच्या दौऱ्यात दिसून आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री पवार यांना 'मदत जाहीर करा, कर्जमाफी द्या' म्हणणाऱ्या शेतकऱ्यांविषयी केलेल्या विधानाने त्यांच्या जखमेवर फुंकर मारण्याऐवजी त्यावर मीठ चोळण्यासारखा प्रकार जबाबदार नेत्यांकडून होताना दिसला. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना धाराशिवमधील वाघेगव्हाणमधील 'मला जीव पहिजे' म्हणाऱ्या मुलीच्या डोळ्यातील भीती दिसली नाही का ? गाळात गेलेल्या सोयाबीनमध्ये लोळणाऱ्या शेतकऱ्याची व्यथा समजली नाही का, असा सवाल यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

लोकसभा निवडणुकीतून सपाटून मार खाणाऱ्या भाजप-महायुतीने विधानसभा निवडणुकीत लाडकी बहीणपासून कर्जमाफीपर्यंत अनेक आश्वासन दिले आणि सत्ता हस्तगत केली. मध्यंतरी वाढलेल्या आत्महत्यावरून कर्जमाफीच्या विषयाने उचल खालली होती. मात्र योग्यवेळी कर्जमाफी देण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले होते.

अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांची संपूर्ण पिके वाहून गेली आहेत. घरादारात पुराचे पाणी जाऊन संपूर्ण घरसंसार, धान्य वाहून गेले आहे. घरात सर्वत्र गाळ साचलेला आहे. प्यायला पाणी आणि खायला अन्नही सध्या शेतकऱ्याकडे नाही. कारण सर्वकाही पुराच्या पाण्यात वाहून गेले आहे. ऊसासारखी पिके पाण्यात बुडाली होती. त्यामुळे सोयाबीन इतर भुसार पिकांचे तर विचारायलाच नको. पण मायबाप सरकार काय शेतकऱ्यांकडे पहायला तयार नाही.

अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानाचा आढाव घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापुरातून सुरुवात केली. मदत देण्यात येईल, नियम बाजूला ठेवून भरपाई दिली जाईल, असे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. मात्र ठोस कोणतीही घोषणा केलेली नाही, त्यामुळे अगोदरच पावसाने झोडपलेल्या शेतकऱ्यांच्या संतापाचा कडेलोट झाला.

(पान 2 वर..)

महाराष्ट्रातील शेतकरी सध्या नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, पिकांचे नुकसान आणि वाढत्या कर्जबाजारीपणामुळे मोठ्या संकटात सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांकडून राज्य सरकारकडे तातडीच्या मदतीची मागणी होत आहे. अलीकडेच पंजाब राज्यात झालेल्या आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना आप सरकारने हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत कालबद्ध मर्यादेत देण्याची घोषणा केली आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मदत मिळावी, अशी मागणी होत आहे. शेतकरी संघटनांचे म्हणणे आहे की, 'जर पंजाब सरकार शेतकऱ्यांना इतक्या मोठ्या प्रमाणात दिलासा देऊ शकते, तर महाराष्ट्र सरकारकडूनही तशीच अपेक्षा आहे. मदत देण्यात टाळाटाळ करून शेतकऱ्यांना आणखी अडचणीत ढकलणे योग्य नाही.'

# २ लाख शेतकऱ्यांच्या तोंडचा घास गेला, १५६ जनावरं दगावली; अतिवृष्टीमुळे ८ जणांचा मृत्यू

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठवाड्यासह पश्चिम महाराष्ट्रात पावसानं अशरक्षः झोडपलं. यामुळे जनजीवन तर विस्कळीत झालीच, शिवाय पिके पाण्याखाली गेली.

तसेच जनावरं वाहून गेली. शेतकऱ्यांचा तोंडचा घास गेल्यानं काहींनी आत्महत्येचा पर्याय निवडला. काळजाला चिर्र करणारा आक्रोश ऐकून अनेकांचे डोळे पाणावले. मात्र, आता हळूहळू महापुराचे पाणी ओसरायला सुरूवात झाली आहे. महामार्गावरील वाहतूक देखील सुरळीत होत आहे. जनजीवन पूर्वपदावर येत आहे.

सीना नदीला आलेल्या महापुराचे पाणी ओसरायला सुरूवात झाली आहे. त्यामुळे दोन दिवसांपासून ठप्प झालेली सोलापूर



- पुणे आणि सोलापूर - कोल्हापूर राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक अखेर सुरळीत झाली आहे. महापुरामुळे मोहोळ तालुक्यातील लांबोटी पूल पाण्याखाली गेला होता. मात्र, पहाटेपासून वाहतूक पुन्हा सुरू करण्यात आली आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील महापूर आणि अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान झाले होते. नुकसानीची आकडेवारी समोर आली असून, तब्बल २२ लाख २३ हजार ६६१ शेतकऱ्यांच्या एकूण १ लाख ९६ हजार ५६१ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाल्याची माहिती आहे. यात ऊस, केळी, बाजरी, मका, डाळिंब अशा विविध पिकांचे नुकसान झाले आहे.

शेतीपिकांव्यतिरिक्त जिल्ह्यात ८ जणांचा मृत्यू झाला आहे. १५६ जनावरे वाहून गेली आहेत. तसेच १८ हजारहून अधिक कोंबड्यांचा बळी गेला आहे. याशिवाय पूर आणि अतिवृष्टीमुळे ८८३ घरांचे पडझड झाली असून, सर्वाधिक फटका माढा, करमाळा, अक्कलकोट, बार्शी आणि उत्तर सोलापूर तालुक्यांना बसला आहे.

या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुरग्रस्त भागांना भेट दिली. तसेच त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी शेतकऱ्यांनी तातडीने मदतीची मागणी केली आहे. दरम्यान, आता सरकारकडून किती आणि कधी मदत मिळणार ? याकडे सर्वांचेच लक्ष आहे.

विकणे /भाड्याने देणे आहे
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५ ८२७५२७४२५३
पत्ताः अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

# पूरग्रस्तांना पुरामुळे झालेल्या सर्व प्रकारच्या नुकसानीसाठी शासनाकडून भरपाई मिळणार - पालकमंत्री गोरे

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** बार्शी तालुक्यातील गौडगाव परिसरात अतिवृष्टी व पुरामुळे खूप मोठे नुकसान झालेले आहे. शेतातील पिके, फळबागा तसेच वाहून गेलेल्या जमिनी, घरांचे, घरातील अन्नधान्यांचे झालेले नुकसान यांचा समावेश भरपाईमध्ये करण्यात येणार असल्याचे आश्वासन राज्याचे ग्राम विकास व पंचायतराज मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी नुकसानग्रस्तांना दिले.

आज सकाळपासून पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी बार्शी तालुक्यातील गौडगाव, जामगाव पा., उपळे, धुमाले, हिंगणी,



मळेगाव व बावी या भागात झालेल्या नुकसानीची पाहणी केली व येथील नागरिकांचे संवाद साधून त्यांना धीर दिला. यावेळी तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार राणा जगजीतसिंह पाटील, माजी आमदार राजेंद्र राऊत, प्रांताधिकारी सदाशिव पडदुणे, बार्शी तहसीलदार एफ.आर. शेख, माजी सभापती अनिल डिसले, मदन दराडे, माजी सभापती केशव घोगरे, संतोष निंबाळकर, प्रमोद वाघमोडे यांच्या सह शेतकरी उपस्थित होते.

पालकमंत्री गोरे यांनी बार्शी तालुक्यातील विविध गावांना भेटी देऊन अतिवृष्टीमुळे व पुरामुळे झालेल्या शेती पिकाच्या नुकसानीची पाहणी केली. हिंगणी येथील द्राक्ष फळबागाच्या नुकसानीची पाहणी करून प्रशासनाने त्वरित पंचनामे करून अहवाल सादर करण्याचे त्यांनी सूचित केले आहे. नुकसानग्रस्तांनी धीर धरावा, शासन पूर्णपणे पाठीशी असून लवकरात लवकर मदत देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे ही त्यांनी यावेळी सांगितले. या आपत्तीच्या काळात प्रशासनाने ही चांगले काम केलेले असून नागरिकांना सुरक्षित ठिकाणी तात्काळ स्थलांतरित करणे, तसेच त्यांना त्या ठिकाणी फूड पॉकेट, पाणी वेळेत देणे महत्त्वाचे होते.

गौडगाव येथील शिरवळकर कुटुंबातला मुलगा रामेश्वर केशव शिरवळकर पुराच्या पाण्यात मृत्यू पावलेला होता, त्या कुटुंबाचे सांत्वन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी त्यांच्या घरी जाऊन केले. तसेच शिरवळकर कुटुंबाला शासनाच्या वतीने तात्काळ मदत म्हणून चार लाखाचा धनादेश देण्याचे निर्देश दिले.

# मुख्यमंत्र्यांना हेलिकॉप्टर कशाला? येऊ द्या ना चालत!

## पूरबाधित तरुणीचा प्रचंड संताप



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरलाही अतिवृष्टीचा जोरदार तडाखा बसला आहे. धरणांचे पाणी सोडले गेल्याने लोकांची घरे आणि संसार पाण्याखाली गेले. अनेक लोक पाण्यामध्ये अडकून पडले असतानाही सरकारकडून वेळेवर मदत पोहोचली नाही. त्यामुळे लोकांमध्ये प्रचंड संताप असून सोलापुरातील एका तरुणीने तर थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही टीका केली.

सोलापूरच्या पूरग्रस्त भागात पाहणीसाठी मुख्यमंत्री फडणवीस येणार म्हणून सर्व यंत्रणा आज कामाला लागल्या होत्या. मुख्यमंत्री हेलिकॉप्टरमधून येणार म्हणून सर्व व्यवस्था केली जात होती. त्यावरून लोकांमध्ये संताप होता. एका तरुणीने तो माध्यमांसमोर व्यक्त केला. मुख्यमंत्री येणार म्हणून आज जी व्यवस्था केली जातेय, यंत्रणा काम करतेय ती काल कुठे होती, असा सवाल तिने केला. काल चॉपर आले होते ते फक्त दोन लोकांना घेऊन गेले. जाताना वरून हात करत होते फक्त. बाकीच्यांचे काय ? आज मुख्यमंत्री येताहेत म्हणून एवढी व्यवस्था केली जातेय, कशाला हवेय हेलिकॉप्टर, येऊ द्या ना चालत, अशी संतप्त प्रतिक्रिया तिने व्यक्त केली. उन्हाळयात आम्हाला पाणी कमी पडतेय तेव्हा का सोडत नाही आणि आता पावसाळयात का पाणी सोडता ? आमची घरे पाण्याखाली गेली, अशी व्यथाही एका तरुणाने मांडली.

निरामय पॅरालिसिस सेंटर
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा अँण्ड फिजिओथेरपी सेंटर
ISO 9001:2015
NGO
खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये
कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करू नका खात्रीशीर उपचार

नातं आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं
समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था
मोबाईल नं. 9503310568
पत्ता: गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापुर

# 'सोलापूर जिल्ह्यात दोन शेतकऱ्यांनी जीवन संपवले'; सोयाबीन पाण्याखाली

**पांगरी (कटूसत्य वृत्त):-** अतिवृष्टीमुळे शेतातील काढणीला आलेल्या सोयाबीन व अन्य पिकांचे नुकसान झाले. 'डोक्यावरील बँकेचे कर्ज कसे फेडू, मुलांचे शिक्षण कसे करू' या विवंचनेतून बार्शी तालुक्यातील कारी व दहिटणे या गावातील शेतकऱ्यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. शरद भागवत गंभीर (वय ३९, रा. कारी) व लक्ष्मण काशीनाथ गावसाने (वय ४२, रा. दहिटणे) असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची नावे आहेत.

कारी येथील गजानन गंभीर यांनी पांगरी पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, दोन-तीन दिवसापासून तो नैराश्यात होता. त्यामुळेच शरदने बुधवारी (ता. २४) शेतात घराजवळ असलेल्या शेलवटीच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. याबाबत पांगरी पोलिसांत अकस्मात मृत्यू म्हणून नोंद झाली असून पोलिस पुढील तपास करीत आहेत. दुसरीकडे दहिटणे येथील लक्ष्मण गावसाने वैरागला बाजारला जातो, असे सांगून मंगळवारी सकाळी दहाच्या सुमारास घरातून बाहेर



पडले होते. दुपारनंतरही ते घरी न आल्याने त्यांच्या पत्नीने दिर सागर गावसाने यांना पतीचा फोन लागत नसल्याचे सांगितले. त्यानंतर सागर यांनी भावाचा शोध घेतला, मात्र ते सापडले नाहीत. त्यानंतर त्यांनी भाऊ हरवला असून कोणाला आढळल्यास सांगावे, असे मोबाईलवर स्टेटस ठेवले होते. दरम्यान, सासुरे येथील सज्जन करंडे यांनी सागर गावसाने यांना बुधवारी सकाळी साडेसातच्या सुमारास फोन केला. यादव यांच्या शेतातील झाडाला एकाने गळफास घेतला आहे, तो तुमचाच भाऊ आहे का ? याची खात्री करा, असे त्यांनी सांगितले. त्यासंदर्भात खात्री (पान 2 वर..)

### मुलगी फार्मसी तर मुलगा इंजिनिअरिंगला, पण...

लक्ष्मण गावसाने यांच्या शेतातील सोयाबीनचे पीक पाण्याखाली गेल्याने एक रूपयाही हाती आला नाही. त्यांची मुलगी 'बी फार्मसी'चे शिक्षण घेत आहे. तर मुलगा धाराशिव येथे शासकीय तंत्रनिकेतनमध्ये इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत आहे. दरम्यान, मयत लक्ष्मण यांच्या खिशात एक चिठ्ठी सापडली असून त्यात त्यांनी 'अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाल्याने आत्महत्या करीत आहे, माज्या मुलांकडे लक्ष द्यावे, मला मदत करा' असे चिठ्ठीत नमूद असल्याचे वैराग पोलिसांनी सांगितले. उद्या (गुरूवारी) यासंदर्भात तपास होईल, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

# शेतकऱ्यांची टिंगल लावली का?

## बार्शीत शेतकऱ्यांनी मंत्र्यांचा ताफा अडवला



**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** बार्शी तालुक्यात अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असताना, सरकारच्या तुटपुंज्या मदतीवर संतप्त शेतकऱ्यांनी शिवसेना मंत्री भरत गोगावले यांचा ताफा कारी गावात अडवला.

"गोगावले शेठ, तळवटाचे पैसेही निघत नाहीत, एकरी 3400 रुपये देऊन शेतकऱ्यांची टिंगल लावली का ?" असा सवाल करत शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली.

सरकारने जाहीर केलेली 2215 कोटींची मदत अपुरी असून, हेक्टरी 50 हजार रुपये मदतीची मागणी शेतकऱ्यांनी केली. माजी आमदार राजेंद्र राऊत आणि गोगावले यांनी शेतकऱ्यांशी चर्चा करत त्यांच्या मागण्या जाणून घेतल्या.

यंदा बार्शीत सरासरीच्या दुप्पट म्हणजेच 980 मिमी पाऊस पडला, ज्यामुळे 76 हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. सोयाबिन, फळबागा आणि (पान 2 वर..)

## संपादकीय

# बळीराजाला बळ द्या

भारत हा कृषिप्रधान देश आहे आणि भारतीय शेती ही बहुतांशी निसर्गावर म्हणजेच पावसावर अवलंबून आहे. पावसाच्या लहरीपणावर या शेतीचे भवितव्यही अवलंबून असते. सध्या महाराष्ट्रामध्ये निसर्गाच्या या लहरीपणामुळेच आणि पावसाच्या अतिरेकीपणामुळे बळीराजासमोर जे संकट उभे राहिले आहे त्या संकटातून त्याला बाहेर काढण्यासाठी केंद्रीय पातळीवर आणि राज्य पातळीवर बळीराजाला आर्थिक आणि मानसिक बळ देण्याची गरज निर्माण झाली आहे. मंगळवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये या बळीराजाला आधार देण्यासाठी विविध प्रकारचे निर्णय जरी घेण्यात आले असले तरी बळीराजाला अपेक्षित असलेला ओला दुष्काळ मात्र जाहीर करण्यात आलेला नाही. कारण सरकारचा कोणताही निर्णय निकषावर असतो आणि ओल्या दुष्काळाचे निकष बदलले असल्याने सध्याची परिस्थिती ओला दुष्काळ जाहीर करण्यासारखी नाही, असे राज्य सरकारचे म्हणणे आहे. त्यामुळेच एनडीआरएफच्या निकषाप्रमाणेच काही प्रमाणात मदत शेतकऱ्यांना दिली जाणार आहे. ही मदत अर्थातच तुटपुंजी असणार आहे आणि बळीराजाला संपूर्णपणे उभा करण्यासाठी ही मदत पुरेशी ठरणार नाही हे उघड आहे.

पावसावर अवलंबून असलेल्या शेतीला जर योग्य प्रमाणात पाऊस मिळाला तर शेतीपासून भरघोस उत्पन्न मिळते आणि शेतर्कयाला काही प्रमाणात आर्थिक समाधानही मिळू शकते. पण जेव्हा कमी पावसामुळे किंवा जास्त पावसामुळे पिकेच उगवत नाहीत, तेव्हा शेतर्कयाच्या हाती काहीच राहत नाही आणि फक्त सरकारी मदतीची आशा त्याच्या डोळ्यात असते. शेती करण्यासाठी विविध प्रकारची कर्जे काढर्णाया शेतर्कयांच्या डोळ्यासमोर ही कर्जे कशी फेडायची हाच एक विषय असतो आणि ही कर्जे न फेडता आल्यामुळेच महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत राहतात हे वास्तवही या निमित्ताने लक्षात घ्यावे लागेल.

महाराष्ट्रात गेल्या कित्येक वर्षांमध्ये प्रथमच तब्बल चार महिने पाऊस पडत आहे. ज्या क्षेत्रामध्ये कधीच जास्त पाऊस पडत नाही अशा जिल्ह्यांमध्येसुद्धा पावसाने मोठ्या प्रमाणात हजेरी लावल्याने तेथील पिकेही नष्ट झाली आहेत. या हंगामामध्ये अनेक ठिकाणी शेतर्कयांना दुबार किंवा तिबार पेरण्या कराव्या लागल्या होत्या. तरीही शेतकऱ्याचे संपूर्ण आर्थिक नियोजन या शेती उत्पादनावर आधारित असते, ते उत्पादनच हाती आले नसल्यामुळे आगामी काळ कसा व्यतित करायचा याची चिंता त्याच्या मनात आहे. अशा परिस्थितीमध्ये राज्य सरकारनेच बळीराजाला बळ देण्याची गरज आहे. कोणत्याही निकषांमध्ये निर्णय गुंतवून न ठेवता किंवा विनाकारण पंचनाम्यासारखे कर्मकांड करण्याची वाट न बघता तातडीने शेतर्कयांपर्यंत ही आर्थिक मदत कशी पोहोचेल हे पाहणे गरजेचे आहे. या पावसाने केवळ शेतीचे नुकसान झाले आहे असे नाही तर पशुधनाचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक जनावरांचा मृत्यू झाला आहे. पशुपालनावर अवलंबून असर्णाया शेतर्कयांनासुद्धा आगामी काळात आपण जगायचे कसे हा प्रश्न त्यामुळे निर्माण झाला आहे. या सर्व गोष्टी लक्षात घेऊनच राज्य सरकारने सहानुभूतीनेच सर्व निर्णय घ्यायला हवेत. मुळात एक विषय प्राधान्याने चर्चेला यायला हवा तो म्हणजे हवामान खाते नक्की करते काय? खरे तर अतिवृष्टीचा किंवा पावसाचा इशारा देण्याचे काम हवामान खात्याने योग्यपणे आणि योग्य वेळेत केले तर शेतीच्या नुकसानाचे प्रमाण कमी करणे शक्य असते.

यावेळी हवामान खात्याचीही अंदाज व्यक्त करताना गफलत झाल्याचे दिसते. यावेळी नेहमीपेक्षा जास्त काळ पाऊस पडत आहे. गेल्या कित्येक वर्षांमध्ये पावसाळी हंगाम कधीच चार महिन्यांचा नव्हता. यावेळी चार महिने संपत आले तरी पाऊस सुरूच आहे. पावसामुळे पिण्याच्या पाण्याची टंचाई जरी संपली असली तरी पिके वाया गेल्यामुळे अन्नधान्याची टंचाई मात्र आगामी कालावधीमध्ये जाणवणार आहे. योग्य प्रमाणात पाऊस पडला असता आणि शेतकऱ्याची पिके योग्य प्रमाणे उगवली असती आणि त्याला ज्या प्रमाणात त्यापासून उत्पन्न मिळाले असते तेवढेच उत्पन्न शेतकऱ्याला मिळाले तरच तो या संकटातून उभा राहू शकतो.

साहजिकच तुटपुंजी मदत देऊन काहीही साध्य होणार नाही. सरकारने केंद्र सरकारची मदत घेऊन किंवा इतर अनेक केंद्रीय योजना अमलात आणून बळीराजाचे अश्रू पुसायला हवेत. गरज पडली तर अनेक अनावश्यक खर्च कमी करून तो निधी बळीराजाला आर्थिक निधी देण्यासाठी वळवायला काहीच हरकत नाही.निवडणूक पार्श्वभूमीवर सरकारने ज्या अनेक रेवडी योजना सुरू केल्या होत्या त्यापैकी काही योजना काही कालावधीपुरत्या स्थगित करून तो वाचलेला निधी बळीराजाच्या खात्यात जायला काहीच हरकत नाही. अशा प्रकारच्या आपत्तीमध्ये नेहमीच सरकारची भूमिका काय राहील याबाबत सगळ्यांचेच लक्ष असते. अशा प्रकारच्या विषयांमध्ये कोणतेही राजकारण न आणता सर्वांनी एकत्रपणे सामोरे जाऊन बळीराजाला बळ देण्याची गरज आहे. कित्येक वर्षात प्रथमच निसर्गाच्या कोपामुळे अभूतपूर्व अशा परिस्थितीला सामोरे जावे लागणार आहे. सर्वांनी एकत्रितपणे आणि गंभीरपणे प्रयत्न केले तरच या संकटातून बळीराजाला बाहेर काढता येणार आहे.

कोणतीही लाल फीत समोर न आणता किंवा राजकारण न आणता सर्वच पातळीवर योग्य वेळी योग्य निर्णय घेण्यात आले तरच बळीराजाला अपेक्षित बळ देता येईल. महाराष्ट्राच्या अर्थकारणाचा प्रमुख भाग असलेले कृषी क्षेत्र आर्थिकदृष्ट्या विस्कळीत झाले तर त्याचा परिणाम महाराष्ट्राच्या एकूण आर्थिक विकासावरही होणार आहे हे विसरून चालणार नाही.

पान १ वरून

## 'सोलापूर जिल्ह्यात दोन...

केली असता तो लक्ष्मण हेच असल्याचे समोर आले. त्यानंतर त्यांनी वैराग पोलिसांत धाव घेतली. पोलिस घटनेचा तपास करीत आहेत.

**चिठ्ठीतील मजकुराने पाणावले डोळे**

३९ वर्षीय शरद गंभीर या तरुण शेतकऱ्याला एक मुलगा-एक मुलगी आहे. कुटुंबासाठी तो आधार होता. सततच्या पावसामुळे त्याच्या पिकात पाणी साचल्याने पीक काढताच आले नाही. आत्महत्येपूर्वी त्याने चिठ्ठी लिहली होती. त्यात 'सारखा पडत आहे, पावसामुळे तुझ्या शेतात पाणी साचले आहे, पिकांचे मोठे नुकसान झाले आहे, आता तुझ्यावर असलेले कर्ज कसे फेडू, मुलांच्या शिक्षणाचे कसे होईल, मला माफ करा, तुझ्या मुलांची काळजी घ्या', असे भावनिक मजकूर त्या चिठ्ठीत आहे.

## शेतकऱ्यांची टिंगल लावली का? ...

द्राक्षबागा उद्ध्वस्त झाल्या. भोगावती, नागझरी, रामनदीसह नद्यांना आलेल्या पुरामुळे 35 गावांतील शेतकऱ्यांचे नुकसान झाले. 78 हजार 722 शेतकऱ्यांचे 75 हजार 874 हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून, 40 जनावरे आणि 18 हजार कोंबड्या मृत्यूमुखी पडल्या. 155 घरांची पडझड झाली. शेतकऱ्यांनी विमा निकष बदलल्यानेही नुकसान झाल्याचा आरोप केला. विरोधी पक्षांनी हेक्टरी 30 ते 50 हजार रुपये मदतीची मागणी लावून धरली आहे. शेतकऱ्यांचा संताप आणि सरकारची अपुरी मदत यामुळे तणाव वाढत आहे.

# आभाळ फाटलं

या वर्षी पावसाने कहर केला. सर्वच भागातील नदी,नाले तुडुंब भरून वाहत आहेत. पुराने अर्ध्या महाराष्ट्रात थैमान घातले आहेत. मराठवाड्यातील १२९ मंडळात अतिवृष्टी झाली आहे. त्याचबरोबर सोलापूर, अहिल्यानगर, जळगाव नाशिक या जिल्ह्यात देखील पावसाने हाहाकार माजवला आहे. प्रशासनाकडील माहितीनुसार सप्टेंबर महिन्यात ७० लाख हेक्टर वरील पिकांचे नुकसान झाले आहे सप्टेंबर मधील २२ दिवसात सरासरीच्या २०० टक्क्यापर्यंत या भागांमध्ये पाऊस झाला आहे. छोट्या छोट्या ओढ्यांना, नद्यांना पूर आले आहेत. गावागावात पाणी घुसले आहे. पुरात अडकलेल्या कुटुंबांना एनडीआरएफ व हेलिकॉप्टरच्या मदतीने सुरक्षित ठिकाणी हलवण्यात येत आहे. शेतकऱ्याच्या तूर, सोयाबीन, उडीद मका,कांदा या खरीप पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. द्राक्षाच्या बागा, ऊस आणि यासारखी बागायती पिके पाण्याखाली गेली आहेत. यावर्षीचा पाऊस किती वर्षाचा बॅकलॉग भरून काढत आहे? असा प्रश्न मनात निर्माण करत आहे. जमिनीत खरवडून गेल्या आहेत. तुझ्या ४५ वर्षाच्या आयुष्यात प्रथमच मी एवढा मोठा पाऊस पाहत आहे. कोकणात असा पाऊस पडतो, परंतु पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यात पहिल्यांदाच असं पावसाचं रुद्र रूप पाहायला मिळालं.

असं म्हणतात माणसाने केलेल्या ग्लोबल वॉर्मिंगचा हा परिणाम आहे. गाड्या, कारखाने, एसी, रेफ्रिजरेटर अशी अनेक साधने पृथ्वीच्या तापमानात वाढ करत आहेत.महात्मा गांधीजी म्हणाले होते, " प्रत्येकाची गरज भागवू शकेल एवढे पृथ्वीकडे नक्कीच आहे, पण तुमच्या हावरटपणावर तिच्याकडे ही उपाय नाही. " हे वाक्य आजच्या काळात खूप महत्त्वाचे आहे. आज आमच्या विकासाची किंमत येणाऱ्या पिढ्यांना चुकवावी लागेल. जी मुले अद्याप जन्मालाच आलेली नाहीत त्यांचा खिसा आज आपण कापतो आहोत. आपण झाडे तोडतो,नद्या संपवून टाकतो ही पर्यावरणाची हानी तर आहेच त्याचबरोबर उद्याच्या पिढ्यांची संपत्ती आपण चोरत आहोत.


अमेरिकेसारखी सर्वात विकसित देश सर्वात जास्त कार्बन उत्सर्जन करतात. त्यामुळे ग्लोबल वॉर्मिंग वाढते.विकास झाला पाहिजे या दुमत नाही, परंतु निसगार्ला ओरबडून तो नसावा. साध्या सार्वजनिक वाहतुकीच्या साधनांमध्ये म्हणजे बस आणि रेल्वे यामध्ये जरी शासनाने खूप मोठ्या सुधारणा केल्या तरी मोटारींची आणि दुचाकींची संख्या कमी होईल आणि प्रदूषण कमी होईल.

पावसामुळे आलेल्या पुराच्या एकेक कहाण्या पाहिल्या,ऐकल्या की मन सुन्न होते. सोलापूर जिल्ह्यातील माढा, मोहोळ दक्षिण आणि उत्तर सोलापूर या तालुक्यातील अनेक गावात सीनेचे पाणी घुसल्यामुळे प्रचंड नुकसान झालं आहे. जनावरे वाहून गेली आहेत. गाड्या, मोटारी, ट्रॅक्टर,ट्रक पाण्याखाली बुडाले आहेत. कालच्या वृत्तपत्रात शाळेतील मुले भिजलेल्या वह्या पुस्तकं सुकवत बसलेली छायाचित्रे पाहून त्यांच्या भाबडेपणाचे कौतुक वाटले. पुरानंतर जगण्याच्या अनेक प्रश्न उभे राहणार आहेत. त्यात शिक्षणाचा नंबर तळात असणार आहे.सुरुवात घरातील चिकल माती काढण्यापासून करावी लागणार आहे. अन्नधान्याच्या आणि वाणसामानाच्या मदतीची गरज प्राधान्याने असणार आहे. आरोग्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात उभे राहणार आहेत.

'लाख मेले तरी चालतील पण लाखांचा पोशिंदा जगला पाहिजे! ' असं म्हणून बळीराजा वर येणाऱ्या अस्मानी, सुलतानी संकटावेळी कोरडी माया दाखवणारे आम्ही कधी स्वतःहून मदतीला धावणार का?

नैसर्गिक संकटाचा पहिला बळी ठरतो तो तळागाळातील व्यक्ती आणि बळीराजा. पावसामुळे ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर तर शहरी भागात रोजंदारीवर काम करणारे कामगार, रस्त्यावरील विक्रेते आज मेटाकुटीला आले आहेत. हातातोंडाशी आलेलं खरिपाचे पीक पावसानं हिरावून घेतलं आहे. आता वर्षभर आपली गुजराण कशी करायची ? मुलांचे शिक्षण, मुलीचे लग्न, दवाखाना, आकस्मित खर्च अशा नाना विविध अडचणींना तोंड देत शेतकऱ्याना हे वर्ष ढकलावा लागणार का? शासनाने आतापर्यंत २२१५ कोटी रुपयांची तातडीची मदत मंजूर केली आहे. ओला दुष्काळ जाहीर करण्याची देखील मागणी होत आहे. शेतकरी सन्मान योजनेची रक्कम कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्याच्या वाढीच्या दराप्रमाणे तसेच नैसर्गिक संकट लक्षात घेऊन वाढवली गेली पाहिजे.

शेती हा एक उद्योग आहे या दृष्टीने याकडे पाहिले जात नाही. अनेक संकटांना तोंड देत केल्या जाणाऱ्या या उद्योगात शेतकरी हाच मालक, कामगार, विक्रेता आहे. उद्योग प्रक्रियेतील उत्पादन, साठवण, मालाची वाहतूक, विक्री अशा सर्व टप्प्यावर त्यालाच काम करावे लागते. यातील कोणत्याही एका टप्प्यावर झालेले नुकसान त्याच्या वर्षभरातील कामगिरीवर परिणाम करते. शासनाने कायम शेतकऱ्याच्या मागे उभारले पाहिजे. जय जवान, जय किसान यापुढे जय तंत्रज्ञान, जय विज्ञान लावून 'जवान' व 'किसान' यांचे महत्व कमी केले जाऊ नये... बळीराजा संकटात आहे त्याला सर्वांच्या मदतीची आवश्यकता आहे.



**- किशोर जाधव,** सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

**प्रबोधन**

# राष्ट्रभाषेविना । राष्ट्र मुके आहे

बोलके देश आणि मुके देश, अशी देशांची वर्गवारी असते काय? आणि जर तसं वर्गीकरण असेल, तर आपला देश बोलका आहे की मुका आहे ? राष्ट्रपिता गांधीजींनी राष्ट्रभाषेविषयी एकदा म्हटलं होतं की, 'ज्या देशाला स्वतःची राष्ट्रभाषा नसते तो देश मुका असतो.' वास्तविक हिंदी ही राज्यघटनेनुसार भारताची राष्ट्रभाषा असूनही, राष्ट्रभाषा म्हणून ती भारतव्यापी नाही. त्यामुळेच १४ सप्टेंबर हा हिंदी ह्या राष्ट्रभाषेचा जयंतीदिन आहे की स्मृतिदिन आहे, असा प्रश्न राष्ट्रप्रेमी व्यक्तींना नक्कीच पडेल.

हिंदी भाषेवर नितांत प्रेम करणारे महर्षी स्वामी दयानंद सरस्वती यांनी आर्य समाजाच्या कायार्चाच एक भाग म्हणून हिंदीच्या प्रसार-प्रचाराला आपलं जीवितकार्य मानलं. 'हिंदी भाषेच्या द्वारे सर्व भारत देशाला एका धाग्यात ओवता येईल,' असा राष्ट्रीय एकात्मतेचा विचार त्यांनी सतत व्यक्त केला. त्यांच्या कायार्पासून प्रेरणा घेऊन नागरी प्रचारिणी सभा, मद्रास, हिंदी प्रचार समिती वर्धा, महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे अशा हिंदी भाषा प्रचार- प्रसारकर्त्या शिक्षण संस्था निर्माण झाल्या. त्यांनी पदव्युत्तर पातळीपर्यंतचे हिंदी भाषेचे अभ्यासक्रम राबवले.

भारत हे लोकशाही राष्ट्र आहे. त्यामुळे राष्ट्रभाषेचा मान हिंदीला मिळणं स्वाभाविक होतं. राष्ट्रवीर सुभाषचंद्र बोस यांनी तर हिंदी भाषेला राष्ट्रभाषेच्या पदावर स्थापित करताना म्हटलं होतं, 'देशाच्या सर्वात मोठ्या भूप्रदेशाची भाषा म्हणून हिंदी हीच राष्ट्रभाषेच्या पदाची अधिकारिणी आहे.' पण हिंदीची आजची स्थिती लक्षात घेता ही अधिकारिणी आहे की वनवासिनी, असा संभ्रम निर्माण होईल इतकी हिंदी ह्या राष्ट्रभाषेची दुर्दशा आपल्या देशात होत आहे. आपल्या देशाचं स्वातंत्र्यपूर्वकाळातील वळण देश हा देव असे माझा असं होतं, आज ते पूर्णपणे बदलले असून देव मस्तकी धरावा । अवघा हलकल्लोळ करावा । ह्या चारशे वर्षांपूर्वीच्या रामदासी आदेशाचं काटेकोर पालन करण्यातच आजचा समाज धन्यता मानतो आहे. गांधीवादी कार्यकर्त्यांना राष्ट्रसेवा हाच धर्म वाटत होता. पण आज धर्मबुद्धीने राष्ट्रभावनेला पराभूत केलं आहे, हे तर भारताचं खरं दुर्भाग्य आहे. प्राचार्य शिवाजीराव भोसले म्हणतात, 'भारताची प्रकृती आणि संस्कृती हा संशोधनाचा विषय असून भारतीयत्त्व या नावाचं जीवनसत्त्व किंवा विचारतत्त्व अस्तित्वात आहे काय ? असेल तर यात धमार्चा भाग किती? इतिहासाचा वाटा किती ? भाषांचं योगदान किती? या संदर्भात सत्यशोधन झालं पाहिजे.' अशा परिस्थितीत राष्ट्रभाषेच्या स्वीकाराचा वा समृद्धीचा प्रश्न तर दूरच राहो, मातृभाषेच्या विकासाकडेही कोणाचं लक्ष नाही, हा खेदाचा विषय आहे.

युरोप, अमेरिका, जपान, रशिया ही प्रगत राष्ट्र आपापल्या राष्ट्रभाषेत आपल्या देशाचा कारभार चालवतात. भारताने मात्र इंग्रजी भाषेच्या जोखडाखालून अजूनही आपली मान काढलेली नाही, आणि पुढेही कधी काढणार नाही.

गेल्या साठ वर्षात आपल्या विद्वानांनी हिंदी भाषेला पारिभाषिक शब्दशक्तीने सामर्थ्य प्रदान करून तिला ज्ञानभाषा बनवलं असतं, तर हा देश प्रगत राष्ट्रांच्या यादीत गणला गेला असता. डॉ. राजनाथ शर्मा म्हणतात, 'इंग्रजी- धार्जिण्या ज्येष्ठ सनदी नोकरशहांनी केंद्र सरकारांच्या दिशाहीन कारभाराचा गैरफायदा घेऊन अहिंदी प्रदेशातील जनतेत हिंदीविरुद्ध विषारी प्रचार केल्यामुळे हिंदी भाषा राष्ट्रभाषेच्या पदाला कायमची मुकली. ' मोठी लोकशाही मिरवणारा हा महादेश मुका असावा, हे केवढ दुर्दैव! म्हणून लक्षात घ्या-

'राष्ट्रभाषेविना। राष्ट्र मुके आहे'
गांधीजींचा आहे। उपदेश ॥ १
राष्ट्रभाषा म्हणे । हिंदी भारताची
सत्ता मात्र तिची। कोठे नाही ॥२
कोर्टकचेऱ्यात इंग्रजीची सत्ता
स्वपुत्रांच्या लाथा। खाते हिंदी ॥ ३
सभेत सन्मान। घरी अपमान
हिंदीचे जीवन । दुर्भाग्याचे ॥४
कपाळीची बिंदी। हिंदीला म्हणती
खात्री न करती। आहे-नाही ॥५
राष्ट्रभाषा हिंदी। घोर उपेक्षित
वारस जिवंत । तिचा नाही ॥ ६
हिंदीदिन आज। झाला स्मृतिदिन
स्मृतीला वंदन । चला करू ॥७



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' अभियानांतर्गत विशेष आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):** आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या वतीने ह्यस्वस्थ नारी, सशक्त परिवारह्व या विशेष राष्ट्रीय अभियानाची सुरुवात १६ सप्टेंबरपासून करण्यात आली आहे. या अभियानाच्या अनुषंगाने अक्कलकोट तालुक्यातील ग्रामपंचायत जेऊर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्र कडबगाव येथे किशोरवयीन मुली, बालके आणि महिलांसाठी विशेष आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.



या शिबिरात पोषण संवाद, विविध आजारांची तपासणी, समुपदेशन आणि बेबी केअर किटचे वाटप करण्यात आले. तालुका आरोग्य अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना आणि केंद्रीय संचार ब्युरो सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने हे उपक्रम राबवण्यात आले.

शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी जेऊर ग्रामपंचायतचे सरपंच पार्वती संपले, उपसरपंच काशिनाथ पाटील, कडबगावचे सरपंच शिवलीला पाटील, क्षेत्रीय प्रचार सहायक अंबादास यादव, अंगणवाडी पर्यवेक्षिका भाग्यश्री कुलकर्णी, प्रज्ञा मोरे आणि कार्यालय सहायक जे. एम. हन्नुरे उपस्थित होते.

केंद्रीय संचार ब्युरोचे अंबादास यादव यांनी पंतप्रधान मातृत्व वंदन योजना, लसीकरण, पोषण अभियान, सुकन्या समृद्धी योजना आणि उज्ज्वला गॅस योजना यांची माहिती दिली. यावेळी १२ अंगणवाडी केंद्रांच्या माध्यमातून गरोदर आणि स्तनदा मातांना बेबी केअर किटचे वाटप करण्यात आले. तसेच कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केलेल्या कुटुंबांचा सन्मान करण्यात आला. सुदृढ बालकांना गौरविण्यात आले.

सेविका आणि मदतनीस यांनी घरगुती धान्यांपासून पोषक आहाराची प्रात्यक्षिके सादर केली. उत्कृष्ट मांडणी करणाऱ्या सेविका व मदतनीस यांना पारितोषिके देण्यात आली. पोषण मूल्याची माहिती देण्यासाठी 'पोषण गुढी' उभारण्यात आली.

सदर आरोग्य तपासणी तालुका आरोग्य अधिकारी डॉ अश्विन करजखेडे, वैद्यकीय अधिकारी डॉ गजानन मरकड, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ भाग्यश्री राऊत, डॉ सुरेखा बिराजदार यांच्या वतीने करण्यात आले.

**तपासणी तपशील पुढीलप्रमाणेः**
**प्राथमिक आरोग्य केंद्र, जेऊर**
गरोदर माता तपासणी - ३५
हिमोग्लोबिन तपासणी - २८३
मधुमेह तपासणी - २८०
रक्तदाब तपासणी - २८०
कॅन्सर तपासणी - २५९
टीबी तपासणी - १४
किशोरवयीन मुली समुपदेशन - २८३
आभा कार्ड वितरण - १२
एकूण लाभार्थी - ३२९
**उपकेंद्र, कडबगाव**
गरोदर माता तपासणी - २२
असंसर्गजन्य आजार तपासणी (पुरुष) - २२
असंसर्गजन्य आजार तपासणी (महिला) - ६५
हिमोग्लोबिन तपासणी - ९५
एकूण लाभार्थी - १७५

या तपासणीसाठी परिचारिका तजबी बिराजदार, आरोग्य सेवक विरेश कोळी, रेखा बुटाळे, आशाताई शिरीन मियादे, रेणुका तलवार आणि सारिका राठोड यांनी विशेष परिश्रम घेतले.

# विद्यार्थ्यांनी शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शासनाने राज्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवगार्तील उच्च शिक्षण घेणाऱ्या इयत्ता 12 नंतरच्या व्यवसायीक व बिगर व्यवसायीक अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या व बारावी मध्ये कमीत कमी 60 टक्के पेक्षा अधिक गुण प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांना खालील प्रवगार्तील रिक्त जागेवर प्रवेश देणे चालु आहे.

व्यवसायिक विभाग- इतर मागास वर्ग (OBC), वि. जा.भ. ज.(VJNT) , वि.मा.प्र.(SBC), दिव्यांग, अनाथ.

बिगर व्यवसायिक विभाग- इतर मागास वर्ग (OBC), वि. जा.भ. ज.(VJNT), दिव्यांग, अनाथ.

वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी मिळणाऱ्या सुविधा व अनुदान- मोफत निवास, बेंडीग साहित्य, भोजन भत्ता, निर्वाह भत्ता, नाईट ड्रेस, वैद्याकिय विद्यार्थ्यांकरिता ॲप्रेन व इतर साहित्य, अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी ब्रॉयलर सुट व ड्रायव्हिंग बोर्ड, शारीरीक शिक्षण/ शिक्षणशास्त्र महाविद्यालय गणवेश, शैक्षणिक सहल, प्रोजेक्ट रिपोर्ट, इ. करीता अनुदान दिले जाते.

तरी वरील प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा व आपला अर्ज त्वरीत https://hmas.mahait.org. या संकेतस्थळावर भरावे. अधिक माहितीसाठी 9890676908 या क्रमांवर संपर्क साधवा. अशी माहिती गृहपाल सी. वाय. जाधव यांनी दिली आहे.

# पारधी समाजाच्या उन्नतीसाठी शासकीय योजना घरपोच



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली 'पहाट' उपक्रमांतर्गत मौजे बादलकोट येथे 'ऑपरेशन पहाट' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात पारधी समाजातील नागरिकांना दैनंदिन जीवनासाठी आवश्यक कागदपत्रे तसेच विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात आली.

या उपक्रमात जातीचे दाखले, आधारकार्ड, रेशनकार्ड मिळवण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची माहिती देण्यात आली. कृषी विभागाच्या विविध शेतीविषयक योजना, आदिवासी विकास महामंडळाच्या बिरसा मुंडा योजना व घरकुल योजना यांचे मार्गदर्शन करण्यात आले. तसेच आरोग्य विभागामार्फत आयुष्यमान भारत कार्ड, आभा कार्ड व त्यासाठीची कार्यपद्धती, शिक्षण विभागामार्फत शालेय साहित्य, गणवेश, वह्या-पुस्तके याबाबतही माहिती देण्यात आली.

कार्यक्रमानंतर पारधी वस्तीतील जिल्हा परिषद शाळा व अंगणवाडीच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी मौजे बादलकोट येथील पारधी समाजातील महिला-पुरुष, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमाला पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जगताप, सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर कुंजीर, तसेच पोलीस कर्मचारी उपस्थित होते. याशिवाय मंडल अधिकारी राजेंद्र वाघमारे, शिक्षण विभागाचे दशरथ मोरे, वैद्यकीय अधिकारी पूजा पवार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री साहेब शेतकऱ्यांच्या...

सोलापूरमधून लातूरमध्ये गेलेल्या मुख्यमंत्र्यांना एका शेतकऱ्याने 'हेक्टरी किती मदत करणार, हे जाहीर करा. नुसत्या घोषणा करू नका,' अशी मागणी केली. त्या वेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'ये बाबा, राजकारण करू नको इथे. राजकारण नाय करायचे' असे सुनावले. मुख्यमंत्र्यांना प्रश्न विचारणाऱ्या त्या शेतकऱ्याला पोलिसांनी त्या ठिकाणी दुसरीकडे नेले. त्यामुळे सर्वस्व हरवलेल्या बळीराजाला आपली व्यथा कुणाकडे मांडायचा. अतिवृष्टी आणि पुराच्या संकटात सर्वस्व हरवलेला बळीराजा काय राजकारण करणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

दुसरीकडे, परांड येथे नुकसानग्रस्तांना संवाद साधताना एका शेतकऱ्याने 'दादा कर्जमाफी करा ना' अशी मागणी केली. त्यावर अजितदादा चिडले. आम्हाला कळंतय ना. त्याला द्या रे मुख्यमंत्रिपद. आम्ही काय इथं गोट्या खेळाला आलोय का. जे काम करतंय ना त्याचीच .... असेही त्यांनी त्या शेतकऱ्याला ऐकवले.

एकंदरीतच मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री पवार यांना शेतकऱ्यांच्या प्रश्नावर संयम राखता आला नाही. फडणवीस आवरते घेतले. मात्र, अजितदादा आपल्या नेहमीच्या शैलीत दांडपट्टा चालवत होते. तसेच सगळ्या गोष्टींची सोंग करता येतात, पण पैशाचा सोंग करता येत नाही, असेही त्यांनी ऐकवले.

मुख्यमंत्री महोदय, ज्या शेतकऱ्याने आपल्या आयुष्याची सर्व पुंजी गमावली आहे. ज्यांच्या घरात आणि शेतातही पाणीच पाणी आहे. पिके तर गेलीच आहेत. या महापुरामुळे शेतकऱ्यांच्या शेतीपासून घरादाराची राखरांगोळी झाली आहे, त्याच्या संवेदना तुम्ही ना कोण समजून घेणार. पिचलेला आणि सर्वस्व गमावलेला शेतकरी तुम्हाला प्रश्न विचारणार नाही तर आणखी कोणाला विचारणार. पण आपणच शेतकऱ्यांना अशा पद्धतीने गप्प करणार असाल तर शेतकऱ्यांनी आपली दुःखं मांडायची तरी कोठे, असा सवाल उपस्थित होत आहे.

## थेऊर येथे घरफोडीत दहा लाखाचे सोने चांदी सह रोख रक्कमे वर दरोडा

**थेऊर (कटूसत्य वृत्त):-** तारमळा रस्त्याच्या कडेला असलेल्या बारीक वाडी येथील दशरथ पांडुरंग कुंजीर यांच्या घरी रात्री चोरट्यांनी घरफोडी करून रोख रकमेसह सुमारे 10 लाखांचे सोने-चांदीचे दागिने चोरून नेल्याची घटना घडली आहे. ही घटना सकाळी उघडकीस आली.

मिळालेल्या माहितीनुसार, दशरथ पांडुरंग कुंजीर (वय 71 रा. तारमळा बारीक वाडी) हे शेतकरी असून कुटुंबासोबत बारीकवाडी परिसरात राहतात. कुंजीर व त्यांची मुले मंगळवारी (ता.23) रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास झोपी गेली असता बुधवारी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास उठले. त्यांनी घराचा दरवाजा आतून उघडण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्यांना घराचा दरवाजा उघडला नाही. त्यानंतर त्यांनी मुलांना फोन करून बाहेरील कडी उघडण्यास सांगितले.त्यानंतर मुलांनाही त्यांच्या घराचा दरवाजा बाहेरून बंद असल्याचे आढळून आले. कुंजीर यांच्या मुलांनी शेजारील मित्रांना सांगून घराच्या कड्या उघडण्यास सांगितल्या. कड्या उघडल्यानंतर सर्वजण बाहेर आले. कुंजीर यांना एका खोलीचे लॉक तुटलेल्या अवस्थेत आढळून आले. त्यानंतर त्यांनी खोलीत जाऊन पाहणी केली असता, खोलीतील समान अस्तव्यस्त पडलेल्या अवस्थेत दिसले घरातील लोखंडी कपाट गायब होते कपाटाचा शोध घेतला असता.

घराजवळील नर्सरीच्या जवळ कपाट दिसले कपाटातील सर्व वस्तू चोरीला गेल्याचे दिसून आले कपाटात 1 लाख 75 हजार रुपयांची रोकड, 5 तोळ्यांची मोहनमाळ, 2 तोळ्यांचा लक्ष्मी हार, दीड तोळ्यांची दोन अंगठ्या, 2 तोळ्याचे कर्णफुले व झुंबके, चांदीचे पैजण, कपडे, साड्या व कागदपत्रे असा सुमारे 10 लाखांचा मुद्देमाल चोरीला गेला असून घटनेची माहिती मिळताच, सहाय्यक पोलीस आयुक्त अनुराधा उदमले, लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक (गुन्हे) स्मिता पाटील, पोलिस उपनिरीक्षक रत्नदीप बिराजदार, मल्हारी ढमढेरे घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली डॉग स्कॉडचे पथक घटनास्थळी दाखल झाले होते

**वात्रटिका**

### आश्वासनाची मदत

ते आले, त्यांनी पाहिले
ते बोलले आणि ते गेले...
काही दिवसांनी पुन्हा
आम्ही म्हणणार काय झाले...
बोललेले लक्षात नाही रहात
वेळ टळली, संकट टळलं...
कोणाचं काय जातं,त्यालाच
माहित ज्याचं काही जळलं...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडुरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडुरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# सोलापूर जिल्हा परिषदेच्या अनुकंपा भरतीचे काम राज्यात आदर्श– ग्रामविकास मंत्री गोरे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** जिल्हा परिषदे सोलापूर चा वतीने 44 कर्मचाऱ्यांना अनुकंपा तत्वावर नियुक्तीचे आदेश राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे हस्ते प्रदान करणेत आले.

या प्रसंगी मित्राचे उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील , जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, विशेष कार्यकारी अधिकारी ज्ञानदेव घुले, उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रभारी प्रकल्प संचालक अमोल जाधव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे, शिक्षणाधिकारी सचिन जगताप, शिक्षणाधिकारी कादर शेख, जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले प्रमुख उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले , राज्यात १०० दिवस कार्यक्रम अंतर्गत अनुकंपा पदभरती पारदर्शक पण राबविणेत आली. सोलापूर जिल्हा परिषदेने यात आघाडी घेत सर्व अनुकंपा अंतर्गत १०० टक्के जागा भरून उत्कृष्ठ काम केले आहे. जिल्हा परिषदेच्या सिईओ हे जर प्रशासक असतील तर किती चांगले प्रकारे काम करू शकतात याचे हे आदर्श उदाहरण आहे. समुपदेशन करून पदस्थापना देणेत आली ही बाब कौतुक करणारी आहे.

## सिईओ कुलदीप जंगम यांचा सन्मान




### मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान प्रभावी पण राबवा– पालकमंत्री जयकुमार गोरे

मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान प्रभावी पण राबवा. सोलापूर जिल्हा हा राज्यात या अभियानात आघाडीवर असायला हवा. जिल्ह्यात परिस्थिती असलेमुळे या अभियानाची गती मंदावली असली तरी पुरं ओसरलेनंतर या अभियानास गती द्या. असे आवाहन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी व्यक्त केले.

### जिल्हा परिषदेचे कौतुक, नियुक्त कर्मचारी यांचे डोळ्यात आनंदाश्रु..!

अनुकंपा भरती प्रक्रियेत जिल्हा परिषद सोलापूरचे पारदर्शक पाऊल टाकत 44 पदांची यशस्वी समुपदेशनाद्वारे भरती केल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम व उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी राबविल्याल्या नाविन्यपूर्ण पॅटर्नचे राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी कौतुक केले असतानाच आज नियुक्ती पत्र दिलेले कर्मचारी यांचे हातात नियुक्तीचे आदेश हातात प्रदान करताच आनंदाश्रु तरळले..!

प्रारंभी सिईओ कुलदीप जंगम यांनी मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाचा बॅच लावून व पुस्तक भेट देऊन पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे स्वागत केले.

सिईओ कुलदीप जंगम म्हणाले, अनुकंपा तत्वावर भरती ही एक संवेदनशील प्रक्रिया असून, तिच्या अंमलबजावणीत पारदर्शकता आणि न्यायाचा तत्वधाराच असणे आवश्यक असते. याच अनुषंगाने जिल्हा परिषदेने संपूर्ण प्रक्रिया वर्तमानपत्र जाहिरात, अर्ज छाननी, सूची प्रसिद्धी आणि प्रत्यक्ष समुपदेशन अशा टप्प्यांमधून पार पाडली. यामध्ये कोणतीही अस्पष्टता न ठेवता, अर्जदारांना संधी आणि माहिती दोन्ही समप्रमाणात उपलब्ध करून देण्यात आली आहे. मोहिम पातळीवर काम करून ही प्रक्रिया पार पाडली असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी आपल्या प्रास्तविक भाषणात सांगितले.

मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांचे आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांचे यामध्ये विशेष योगदान राहिलेले राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी सन्मानपत्र देऊन गौरव केला. सिईओ कुलदीप जंगम व त्यांचे सहकारी अधिकारी व कर्मचारी यांनी संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक, तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि वेळेवर पार पाडल्या बद्दल अभिनंदन केले. सुत्रसंचालन जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांनी केले.

सदर अनुकंपा भरती प्रकियेसाठी प्रशासन अधिकारी अविनाश गोडसे,सचिन साळुंखे प्रदीप सगट, महेश केंद्रे, शिवाजी राठोड, मोहित वाघमारे,कृष्णकांत लोंढे,अरविंद सोनवणे, संतोष शिंदे, तुषार इटकर, किरण जाधव, ऋषिकेश जाधव, इराण्णा भरडे,हनुमंत गायकवाड, कृष्णा आधटराव, रोहीत शिंदे, गणेश वटवटे,आदम नाईक यांनी परिश्रम घेतले. उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी

## राज्य साखर संघाच्या वार्षिक सभेत स्वरुपाराणी मोहिते पाटील यांची उपस्थिती

**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाची ६९ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवार दि.२५/०९/२०२५ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे संपन्न झाली.

सहकार महर्षि शंकरराव मोहिते–पाटील सहकारी साखर कारखान्याचे प्रतिनिधी म्हणून स्वरुपाराणी जयसिंह मोहिते–पाटील सदर सभेस उपस्थित होत्या.



सध्या राज्यात सर्वत्र पाऊस मोठ्या प्रमाणावर सुरु असून शेतकऱ्यांचे उभ्या पिकांचे नुकसान झाले असून राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा असा ठराव करून साखर संघाचे वतीने राज्य शासनास पाठवावा असा आयत्या वेळच्या विषयात ठराव मांडला.

सदर ठरावास साखर संघाचे अध्यक्ष पी.डी.पाटील, उपाध्यक्ष प्रतापराव ओव्हाळ, प्रकाश आवाडे, व्यवस्थापकीय संचालक, संजय खताळ, संचालक मंडळ व मान्यवरांनी मान्यता देवुन राज्य शासनाकडे ओला दुष्काळ जाहीर करण्याच्या ठराव करून पाठविणेस मान्यता दिली.

सदर सभेत सयाजीराजे संग्रामसिंह मोहिते–पाटील, सभापती, शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलुज, राज्यातील साखर कारखान्यांचे चेअरमन, व्हा.चेअरमन, कार्यकारी संचालक व प्रतिनिधी उपस्थित होते.

## गरब्याच्या आयोजनांमुळे सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेण्यासाठी महिलांना सुरक्षित व्यासपीठ - अमृता फडणवीस

**सांगोला (कटूसत्य वृत्त):–** गरब्याचे आयोजन केल्याने महिलांना नृत्य आणि पारंपरिक कला सादर करण्याची संधी मिळते, ज्यामुळे त्यांचे कलागुण प्रदर्शित होतात आणि त्यांना प्रोत्साहन मिळते. या आयोजनांमुळे महिलांना एकत्र येण्यासाठी आणि सांस्कृतिक कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेण्यासाठी एक सुरक्षित आणि आनंदी व्यासपीठ मिळते. यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते आणि समाजात त्यांच्या कलागुणांना अधिक महत्त्व प्राप्त होते, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर अमृता फडणवीस यांना गरबा खेळण्याचा मोह आवरता आला नाही. गरब्याच्या विविध गाण्यांवर त्यांनी काही तरुणी, महिलांसह गरबा खेळण्याचा अगदी मनमुराद आनंद लुटला. यावेळी सहभागी झालेल्या तरुणी, महिलांसह अमृता फडणवीस याही गरबा खेळण्यात सहभागी झाल्याने सर्वांनाच आनंद झाला.छ. शिवाजीनगर नवरात्रोत्सव मंडळ, छ. शिवाजीनगर, सांगोला व जोतिर्लिंग प्रतिष्ठान संचलित, जोतिर्लिंग प्रतिष्ठान आयोजित दांडिया गरबा नाईट–२०२५ या कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, माजी जिल्हा परिषद सदस्या जिजामाला रणजितसिंह नाईक निंबाळकर, भाजप जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत, सुजाता चेतनसिंह केदार सावंत, पुण्याचे माजी नगरसेवक सम्राट थोरात, सिंगर संजू राठोड, बिग बॉस फेम जानवी किल्लेकर यांच्यासह हजारो महिला उपस्थित होत्या.



राज्यात अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून एनडीआरएफ व एसडीआरएफ यांच्या माध्यमातून मदत केली जात आहे. नुकसानीचे पंचनामे केले जात आहेत. राज्यावरील संकट लवकरात लवकर दूर होऊ दे असे देवीला साकडं घातलं आहे.
**– अमृता फडणवीस**

पुढे बोलताना अमृता फडणवीस म्हणाल्या की, सांगोल्याच्या कर्तबगार महिला आणि पुरुषांनी डाळींबाच्या उत्पादनात सांगोल्याचे नाव देश आणि जागतिक पातळीवरती पोहचवून देशाला परकीय चलन मिळवून देण्यामध्ये मोलाचे सहकार्य केले आहे असे त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत म्हणाले की, सांगोल्याच्या भूमीत गेल्या तीन वर्षांपासून सातत्याने चालवलेला भव्य दांडिया स्पर्धा हा फक्त मनोरंजनापुरता कार्यक्रम नाही. हा उपक्रम म्हणजे एक संस्कृतीचा उत्सव आहे, एक महिला सक्षमीकरणाचा संकल्प आहे. समाजात महिला ही घरासाठी, कुटुंबासाठी, नातीगोतींसाठी स्वतःला पूर्णपणे अर्पण करते. पण तिच्या कलेला, कौशल्याला, मेहनतीला कौतुकाची दाद मिळत नाही, सन्मान मिळत नाही. आज इथल्या प्रत्येक महिलेला, प्रत्येक बहिणीला, हक्काचं व्यासपीठ मिळावं, तिच्या कलागुणांना वाव मिळावा, तिचं कौतुक व्हावं हाच या उपक्रमामागचा उद्देश आहे. अमृता फडणवीस यांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाचं सौंदर्य अधिकच उजळून निघालं आहे. त्यांच्या कायार्तून महिलांना प्रेरणा मिळते, त्यांच्या उपस्थितीने आजच्या या व्यासपीठाचं महत्त्व अधिक अधोरेखित झालं आहे. सांगोला हा फक्त दांडियाचा उत्सव साजरा करणारं शहर राहणार नाही,

तर महिला सक्षमीकरणाचं केंद्रबिंदू बनणार आहे असे त्यांनी सांगितले.या महोत्सवाला महिलांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत पारंपरिक गुजराथी, राजस्थानी वेषभूषा करून दांडिया खेळण्यास आल्या होत्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठीअफजल शेख, किरण चव्हाण, इन्नुस नदाफ, विनोद काटकर, सौरभ देशपांडे, चिवळ्या कोळी, अविनाश गायकवाड, नागेश लोखंडे, राजू शिंदे, अनिल शिंदे, पिंटू शिंदे, सुरेश जगधने, शुभम डांगे, शाम माळी यांच्यासह

छ. शिवाजीनगर नवरात्रोत्सव मंडळ, छ. शिवाजीनगर, सांगोला व जोतिर्लिंग प्रतिष्ठान संचलित, जोतिर्लिंग प्रतिष्ठानचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.

## व्हॉलीबॉल स्पर्धेत एमआयटी ज्युनिअर कॉलेजचे यश



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** उत्तर सोलापूर येथे झालेल्या तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत एमआयटी ज्युनिअर कॉलेजच्या संघाने दमदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले. नरसिंह विद्यालय, पाकणी येथे झालेल्या १९ वषार्खालील मुलींच्या आणि १७ वषार्खालील मुलांच्या विजेतेपद पटकावले. तसेच १९ वषार्खालील मुलांच्या संघाने प्रतिस्पर्ध्यांना कडवी झुंज देत द्वितीय क्रमांक मिळवला.

१९ वषार्खालील मुलींचा संघ विजयी संघ – कर्णधार श्रुतिका वीरपे, गौरी सुर्वे, राजनंदिनी घडमोडे, श्रुति कदम, श्रद्धा जाधव, अंजली पाटील, देवीयानी यादव, साक्षी राठोड, श्रावणी कोकाटे, अदिती शिंदे, गायत्री कवाडे व दिव्या पवार.

१७ वर्षाखालील मुलांचा संघ विजेता संघ – कर्णधार श्रेयश सातपुते, अंगद भगत, समर्थ तांदळे, वेदांत खमीतकर, आर्यन कोकणे, समर्थ देशमुख, रमण गुंडेटी, कौस्तुभ चौगुले व ओम भोसले.

दोन्ही संघांनी सांघिक कौशल्याच्या जोरावर उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपद मिळवले. या यशाबद्दल एमआयटी संस्थेच्या वतीने महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.राजकुमार गायकवाड व क्रीडा शिक्षिका सीमा मादगुंडी यांनी सर्व विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करत पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

## जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त भव्य मोटारसायकल रॅली

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):–** जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त लायन्स क्लब ऑफ अक्कलकोट आणि अक्कलकोट केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीचे उद्घाटन अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक श्री. दीपकजी भिताडे साहेब यांच्या हस्ते प्लॅग दाखवून करण्यात आले.



रॅलीची सुरुवात श्री खंडोबा मंदिरापासून झाली. मार्गात एसटी स्टँड, कारंजा चौक, फत्तेसिंह चौक, एवन चौक या प्रमुख ठिकाणांमधून रॅलीने भव्य प्रेक्षणीय फेरी घेतली. शेवटी लायन्स शिशु व प्राथमिक शाळा अक्कलकोट येथे चहा–नाश्त्याने कार्यक्रमाची सांगता झाली.

या रॅलीत तालुक्यातील महिला व पुरुष फार्मासिस्ट मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. फार्मासिस्ट दिनाच्या जनजागृतीसाठी विविध स्लोगनसह फलक घेऊन, स्पीकरवर समाज प्रबोधन करण्यात आले. या उपक्रमासाठी मार्गदर्शन श्री. शिवशरण खुबा यांनी केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोलापूर माझी जिल्हा अध्यक्ष श्री. बसवराज मणूरे, उपाध्यक्ष श्री. सिद्धाराम घयाळे, तसेच तालुक्यातील मान्यवर फार्मासिस्ट व लायन्स क्लब सदस्य यांनी अथक प्रयत्न केले. कार्यक्रमात लायन्स क्लब ऑफ अक्कलकोट चे पदाधिकारी –झोन चेअरमन लायन मल्लीकाजुन मसुती, सचिव लायन शिरीष पंडीत, खजिनदार लायन तेली, झोन सेक्रेटरी लायन MJF महिबुब सलगरकर, लायन सुभाष गडसिंग, लायन काटगाव कापसे, तसेच इतर लायन बंधू, अक्कलकोट केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.दुपारी लायन्स क्लब ऑफ अक्कलकोट चे अध्यक्ष लायन अभय खोबरे यांनी श्री गंगाधर कापसे मानपत्र व सन्माननीय मोमेंटो देऊन सर्व उपस्थितांचा सत्कार करण्यात आला.

यानंतर आरोग्यविषयक सेमिनारचे आयोजन करण्यात आले.

डॉ. करुणा कबाडी यांनी "स्ट्रेस व मानसिक स्वास्थ्य" या विषयावर मार्गदर्शन केले.

त्यानंतर डॉ. राहुल करीमुंगी यांनी "मानसिक स्वास्थ्य, स्ट्रेस व काडीर्याक" या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.


या संपूर्ण कार्यक्रमाचे प्रास्ताविक लायन शिरीष पंडीत यांनी केले व आभार प्रदर्शनही त्यांनीच मानले. हा कार्यक्रम भव्य, उत्साहवर्धक आणि यशस्वीरीत्या पार पडला.

लायन्स क्लब ऑफ अक्कलकोट आणि अक्कलकोट केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन यांच्या या उपक्रमाचे शहरवासीयांनी कौतुक केले.

## रो.ह.यो, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांचा सोलापूर जिल्हा दौरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** राज्याचे रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खारभूमी विकास, मंत्री भरत गोगावले हे गुरूवार दि.25 सप्टेंबर 2025 सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा पुढील प्रमाणे आहे. दि. 25 सप्टेंबर 2025 रोजी सकाळी 10.00 वा. तालुका माढा जि. सोलापूर येथे आगमन व अतिवृष्टीमुळे बाधित भागाचा पहाणी दौरा. दुपारी 01.00 वाजता ता. माढा जि. सोलापूर येथून बार्शी जि. सोलापूर कड़े प्रयाण. व दुपारी 02.00 वा. बार्शी जि. सोलापूर येथे आगमन व अतिवृष्टीमुळे बाधित भागाचा पाहणी दौरा. व सोईनुसार बार्शी येथून महड जि. रायगड कडे प्रयाण करतील.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) नाना पाटेकर, अनिल कपूर, अक्षय कुमार यांचा एक विनोदी चित्रपट, स्वागत (इंग्रजीत) २) पोवाडे गाणारा ३) उलटी, वमन ४) बारा गुणिले पाच ५) याचे कणिस भाजून खातात ६) क्रिकेटमधील सिक्सर (मराठीत) ९) दहा गुणिले सात ११) चौघड्याच्या जोडीचे वाद्य १२) तोपर्यंत (ग्रामीण भाषेत) १४) सर्वत्र पसरलेला सुगंध १५) पुरूषांचा नेसावयाचा पंचा २१) श्वास घेण्याची क्रिया २३) छोटा दिवा २४) कपाची जोडीदारीण २६) पटकन, त्वरेने एक फुलझाड २९) झी मराठी वरील विनोदी मालिका-चला ** येऊ द्या ३०) विदूषक ३३) विषमच्या विरूध्दार्थी ३५) पाच आणि दोन मिळून होणारी संख्या ३७) छोटा, बारीक ३९) पतीची आई ४०) एक अभिनेता-**** खान ४१) इराकची राजधानी ४३) कापड फाटताना होणारा आवाज ४४) फर्निचरसाठी या वृक्षाचे लाकूड वापरतात ४५) मराठी चित्रपटसृष्टीतील अभिनेता-*** भावे ४७) बोल्टचा जोडीदार, टन उलट लिहा ४९) पैसा, संपत्ती ५१) कविता बनविणारा

**आडवे शब्द :** १) हवामानाचा अंदाज वर्तविणारे कार्यालय
३) भारताचे दक्षिणेकडील एक राज्य
५) एक भारतीय फलंदाज-*** पांडे
७) मांजरामधील नर जात ८) अन्नाचा कण श्वासनलिकेत गेल्यास लागतो ***
१०) व्यायाम, मेहनत १३) रांग, माळ १५) खतरा १६) माईंड (मराठीत), चित्त
१७) जंगल, अरण्य १८) आई (इंग्रजीत) १९) जरचा साथीदार २०) देव
२२) एक मराठी महिना २३) परंतु, पक्ष्याचे पंख (हिंदीत)
२५) कोकणातील एक पर्यटनाचे स्थळ २७) उन्हाळ्यातील एक महिना २८) मराठी चित्रपट सृष्टीतील एक ज्येष्ठ अभिनेते ३१) वट उलट लिहा ३२) पंधरा दुणे
३४) रानटी बैल ३६) उद्या (हिंदीत) ३८) शरीरावरील मोठा तीळ
४०) लिंबू पाण्याचे पेय ४२) विहिरीतून पाणी खेचण्याचे पूर्वीचे चक्राकार साधन
४४) वर्ष (हिंदीत) ४६) मादीच्या विरूध्दार्थी
४७) नव्वदच्या दशकातील हिंदी सिनेसृष्टीतील एक अभिनेत्री
४८) समर्थ रामदास स्वामींनी लिहिलेला ग्रंथ
५०) कडक, न दबणारे ५२) नऊ गुणिले दहा
५३) मेंढीपालन करणारा एक वर्ग

## सुडोकु - 64

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 | | 4 | 9 | | | 1 | |
| 7 | 4 | | | 1 | 8 | | | |
| 1 | 9 | 6 | 7 | | | | 2 | 4 |
| | | | 5 | | 1 | 7 | 6 | 2 |
| | | 3 | | 2 | 7 | | 5 | 9 |
| | | | | 4 | | 3 | | |
| | 7 | 8 | 9 | | | | | |
| 4 | 2 | 9 | | | | | 7 | 3 |
| | | | 3 | 7 | | | 9 | 8 |

निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

–: संपर्क :–
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहितीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

CHANGE IN NAME

"I am changing my name from Naduf A RAJAK MASHAK "has been changed to new name A Razzaq MASHAK NADAF Add:-435 NAGNATH NAGAR Near Majarewadi BHG. 9,Solapur for passport issuance. (M-2376034)

CHANGE IN NAME

"I am changing my name from GAUS AFZAL CHIDGUPE "has been changed to new name GAUS AFZAL CHIDGUMPI for passport issuance.

CHANGE IN NAME

"I am changing my name from AAFREEN GAUS CHIDGUPE "has been changed to new name AAFREEN GAUS CHIDGUMPI for passport issuance.

# २ लाख शेतकऱ्यांच्या तोंडचा घास गेला

## सोलापूरात पावसांचं रौद्ररूप

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठवाड्यासह पश्चिम महाराष्ट्रात पावसानं अशरक्षः झोडपलं. यामुळे जनजीवन तर विस्कळीत झालीच, शिवाय पिके पाण्याखाली गेली.तसेच जनावरं वाहून गेली. शेतकऱ्यांचा तोंडचा घास गेल्यानं काहींनी आत्महत्येचा पर्याय निवडला. काळजाला चिर्र करणारा आक्रोश ऐकून अनेकांचे डोळे पाणावले. मात्र, आता हळूहळू महापुराचे पाणी ओसरायला सुरूवात झाली आहे. महामार्गावरील वाहतूक देखील सुरळीत होत आहे. जनजीवन पूर्वपदावर येत आहे.



सीना नदीला आलेल्या महापुराचे पाणी ओसरायला सुरूवात झाली आहे. त्यामुळे दोन दिवसांपासून ठप्प झालेली सोलापूर - पुणे आणि सोलापूर - कोल्हापूर राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक अखेर सुरळीत झाली आहे. महापुरामुळे मोहोळ तालुक्यातील लांबोटी पूल पाण्याखाली गेला होता. मात्र, पहाटेपासून वाहतूक पुन्हा सुरू करण्यात आली आहे. दरम्यान, जिल्ह्यातील महापूर आणि अतिनवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान झाले होते. नुकसानीची आकडेवारी समोर आली असून, तब्बल २२ लाख २३ हजार ६६१ शेतकऱ्यांच्या एकूण १ लाख ९६ हजार ५६१ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाल्याची माहिती आहे. यात ऊस, केळी, बाजरी, मका, डाळिंब अशा विविध पिकांचे नुकसान झाले आहे.

शेती पिकांव्यतिरिक्त जिल्ह्यात ८ जणांचा मृत्यू झाला आहे. १५६ जनावरे वाहून गेली आहेत. तसेच १८ हजारहून अधिक कोंबड्यांचा बळी गेला आहे. याशिवाय पूर आणि अतिवृष्टीमुळे ८८३ घरांचे पडझड झाली असून, सर्वाधिक फटका माढा, करमाळा, अक्कलकोट, बार्शी आणि उत्तर सोलापूर तालुक्यांना बसला आहे.

या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुरग्रस्त भागांना भेट दिली. तसेच त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी शेतकऱ्यांनी तातडीने मदतीची मागणी केली आहे. दरम्यान, आता सरकारकडून किती आणि कधी मदत मिळणार? याकडे सर्वांचेच लक्ष आहे.

# लोकमंगल कृषी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना एकक स्थापना दिवस साजरा

**वडाळा (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा येथे दिनांक २४ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना एकक स्थापना दिवस रक्तदान शिबिर आयोजनाने उत्साहात संपन्न झाला. सदरील रक्तदान शिबिराचे आयोजन लोकमंगल कृषी व कृषी संलग्नित महाविद्यालयाच्या रासेयो एकका मार्फत करण्यात आले होते. सदरील शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयातील वैश्विक दाता रक्तगट असणाऱ्या मृदा विज्ञान व कृषी रसायनशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक प्रा. संजय सिरसट यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे, सिद्धेश्वर



रक्तपेढीचे प्रमुख डॉ. एच. के. गलियाल, रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. अजित कुरे, महाविद्यालयातील सन्माननीय प्राध्यापक वृंद आणि रासेयो स्वयंसेवक यांची उपस्थिती होती. सदरील रक्तदान शिबिरात लोकमंगल शैक्षणिक संकुलातील ६० युवा रक्तदात्यांनी आपले बहुमूल्य योगदान देऊन राष्ट्रकार्य बजावले. रक्तदान शिबिराच्या समारोपप्रसंगी सिद्धेश्वर रक्तपेढी सोलापूर यांच्या सर्व सहकाऱ्यांचा सन्मान प्राचार्य डॉ. अमोल शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. रक्तदान शिबिराच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रमाधिकारी प्रा. अजित कुरे यांनी सिद्धेश्वर रक्तपेढीचे सर्व पदाधिकारी, रक्तदाते आणि स्वयंसेवकांचे आभार मानून शिबिराची सांगता करण्यात आली. सदरील शिबिराच्या आयोजनासाठी लोकमंगल कृषी व कृषी संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य, रासेयो कार्यक्रमाधिकारी, प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अमूल्य सहकार्य लाभले.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार मदत द्या

## सोलापूर जिल्हा 'ओला दुष्काळग्रस्त' घोषित करा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस सीए विनोद धर्मा भोसले यांनी जिल्हाधिकारी सोलापूर कुमार आशीर्वाद यांना निवेदन सादर करून शासन दरबारी ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली.

विनोद भोसले यांनी निवेदनाद्वारे खालील नमूद मागण्या पुढीलप्रमाणे आहेत :

१. जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी रु. ५० हजार मदत द्यावी.

२. सोलापूर जिल्हा 'ओला दुष्काळग्रस्त' घोषित करावा.

३. अतिवृष्टीमुळे वाहून गेलेली जनावरे व मृत्यू झालेल्या पशुधनाच्या नुकसानीचा पंचनामा करून योग्य ती नुकसानभरपाई द्यावी.

४. पडझड झालेल्या घरांचे पंचनामे करून कायमस्वरूपी पुनर्वसन व तातडीने फडझडची मदत द्यावी.

५. खरीप पिकांचे झालेले प्रचंड नुकसान लक्षात घेऊन शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत द्यावी.

काँग्रेस वर्किंग कमिटीच्या सदस्य मा. खासदार प्रणितीताई शिंदे व प्रदेशाध्यक्ष मा. हर्षवर्धन सपकाळ यांच्या निदेर्शानुसार ही मागणी करण्यात आली असल्याचे सीए विनोद धर्मा भोसले यांनी सांगितले.

अतिवृष्टीमुळे शेतकरी संकटात सापडले असून त्यांना मदतीचा दिलासा तातडीने मिळणे गरजेचे आहे, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस विनोद भोसले यांच्या वतीने करण्यात आली आहे.

यावेळी युवक काँग्रेसचे अध्यक्ष गणेश डोंगरे, VJNT अध्यक्ष युवराज जाधव, सुभाष वाघमारे आदी उपस्थित होते.

# अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान

## शेतकऱ्यांसाठी नुकसानभरपाईची मागणी



**मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):** मंगळवेढा तालुक्यात गेल्या दोन ते तीन आठवड्यांपासून सतत अतिवृष्टी होत आहे. यामुळे खरीप हंगामातील पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून, विशेषतः सूर्यफूल, मका, कांदा, बाजरी, उडीद, तूर तसेच फळबागांवर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला आहे.

यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने बुधवारी उपविभागीय अधिकारी मंगळवेढा यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली की, शेतकऱ्यांसाठी तातडीने उपाययोजना करावी. नायब तहसीलदार बाळासाहेब मोरे यांनी हे निवेदन स्वीकारले.

निवेदनात सरकारकडे विनंती करण्यात आली आहे की, मंगळवेढा तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना कोणतेही जाचक निकष न लावता सरसकट नुकसानभरपाई द्यावी. रब्बी हंगामासाठी लागणारी बियाणे, खते व औषधांसाठी विशेष आर्थिक मदत आणि सवलतीच्या योजना राबवाव्यात. तसेच बागायत पिकांचे नुकसान लक्षात घेऊन अतिरिक्त नुकसानभरपाई पॅकेज दिले जावे.

यावेळी अनिल सावंत यांनी सांगितले की, "अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे पिके पाण्याखाली नष्ट झाली आहेत आणि शेतकरीवर्ग पूर्णतः हवालदिल झाला आहे. शेतांमध्ये अजूनही पाणी साठलेले असल्याने रब्बी हंगामातील पेरणी व उत्पादनावरही परिणाम होणार आहे. परिणामी शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती गंभीर बनली आहे."

सदर परिस्थिती नैसर्गिक आपत्ती म्हणून नोंदवून शासनाने तातडीने शेतकऱ्यांना मदत करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली. या वेळी माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, राहुल शहा, अनिल सावंत, चंद्रशेखर कोंडूभैरी, मारुती वाकडे, सुभाष कदम, आबासाहेब माळी, राजाभाऊ चेळेकर, महादेव जिरगे, दादासाहेब पवार, संतोष रंधवे, माणिक गुंगे, सुरेश कट्टे, साहेबराव पवार, बबन ढावरे, जमीर इनामदार, संगीता कट्टे, स्मिता अवघडे, मंदाकिनी सावजी, प्रियदर्शनी नागणे, सुखदेव डोरले, सीताराम भगरे, सागर गुरव, रावसाहेब बनसोडे, संजय मस्के, राहुल चौगुले, संभाजी भोसले, पंडित गवळी, वैभव ठेंगील आदी उपस्थित होते.

**लक्ष्मणराव ढोबळे यांचे उद्धरण:**

"तातडीने ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत करणे ही काळाची गरज आहे. अन्नदात्यांचे अस्तित्व टिकवणे समाज आणि अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. शेतकऱ्यांना या संकटातून बाहेर काढणे आणि त्यांना आधार देणे हे शासनाचे प्रथम कर्तव्य आहे."

# जिल्ह्यात खरीप पिकांसह फळबागांचेही पंचनामे करावेत - सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यातील अतिवृष्टी व पुरसदृश्य परिस्थितीमुळे खरीप पिकांबरोबरच फळबागांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. तरी सर्व फळबागांचेही पंचनामे करण्याचे निर्देश सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांनी दिले.

करमाळा तालुक्यातील कोर्टी, सरपडोह व बिटरगाव श्री या गावांतील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली, त्याप्रसंगी ते बोलत होते.



यावेळी मंत्री शिरसाट यांनी सांगितले की, सिना नदीच्या महापुरामुळे नदीकाठावरील शेती पूर्णतः उध्वस्त झाली असून काही ठिकाणी जमीन खरडून गेली आहे. अनेक शेतकऱ्यांच्या शेतात अजूनही पाणी भरलेले असून पंचनामे करण्यासाठी सर्कल व तलाठी जाऊ शकत नाहीत, त्यामुळे पंचनामे ड्रोनच्या माध्यमातून करण्याची मागणी त्यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत केली असल्याचे सांगितले. तसेच सोलापूर जिल्ह्यातील जास्त नुकसान लक्षात घेता येथील शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत शासनाकडून मिळवून देण्याची ग्वाही त्यांनी दिली.यावेळी करमाळा तहसीलदार शिल्पा ठोकडे, मंगेश चिवटे, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष शंभूराजे जगताप, महेश चिवटे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

# महापालिका व एनटीपीसीचा करार : दोन वर्षे वृक्षारोपण आणि देखभाल उपक्रम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त)** : सोलापूर शहरातील हरित क्षेत्र वाढीसाठी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला असून सोलापूर महापालिका व नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन (एनटीपीसी) यांच्यात वृक्षारोपण व देखभाल प्रकल्पासाठी सामंजस्य करार (एमओयू) करण्यात आला आहे. हा उपक्रम महाराष्ट्र शासनाच्या *माझी वसुंधरा अभियानांतर्गत* राबविण्यात येणार आहे.

करारानुसार २०२५-२६ व २०२६-२७ या दोन वर्षांत शहरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण केले जाईल. त्यानंतर सलग दोन वर्षे झाडांची जोपासना व देखभाल केली जाणार आहे. स्थानिक हवामानाला अनुरूप जाती, फळझाडे तसेच जलद वाढणाऱ्या झाडांची लागवड करण्यात येणार आहे. या प्रकल्पाचे निरीक्षण जीआयएस व ड्रोन तंत्रज्ञानाद्वारे होणार असून झाडांची किमान ९० टक्के जोपासना सुनिश्चित करण्याची जबाबदारी महापालिकेने स्वीकारली आहे.

या करारामुळे शहरात हरित क्षेत्र वाढून स्वच्छ, निरोगी आणि शाश्वत पर्यावरण घडण्यास हातभार लागणार आहे, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

बुधवारी महापालिकेत झालेल्या करार कार्यक्रमाला आयुक्त डॉ. सचिन ओंम्बासे, एनटीपीसीचे मुख्य महाव्यवस्थापक एम. के. बेबी, सहाय्यक महाव्यवस्थापक रफिकुल इस्लाम, उपायुक्त तैमूर मुलाणी, उपमहाव्यवस्थापक अमित कुमार सिंह, सहाय्यक आयुक्त मनीषा मगर, अंतर्गत लेखा परीक्षक राहुल कुलकर्णी, पर्यावरण अधिकारी अक्षय मोरे, उद्यान अधीक्षक स्वप्निल सोलंकर आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# सोलापूरात पूरस्थितीचा फटका

## शेकडो शाळा धोक्यात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे तब्बल ३४५ जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा बाधित झाल्या आहेत. ही माहिती प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी दिली. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या सूचनेनुसार गटशिक्षण अधिकाऱ्यांना तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तालुका पातळीवरून माहिती संकलनाचे काम सुरू असून, बाधित शाळांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता असल्याचेही शेख यांनी सांगितले.

अतिवृष्टीमुळे २३ व २४ सप्टेंबर रोजी जिल्ह्यातील शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली होती. ज्या ठिकाणी वर्ग खोल्या धोकादायक स्थितीत आहेत, तेथे विद्यार्थ्यांना न बसविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच आवश्यकतेनुसार शाळा व्यवस्थापन समितीच्या मदतीने पयार्यी व्यवस्था करण्यास सांगण्यात आले आहे.

पूराचा धोका असलेल्या शाळांमधील महत्त्वाचे प्रशासकीय कागदपत्रे, धान्य व साहित्य तात्काळ सुरक्षितस्थळी हलविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच वरिष्ठ कार्यालयाकडून मिळणाऱ्या सर्व सूचना समाजमाध्यमांद्वारे अधिकारी, कर्मचारी व पालकांपर्यंत त्वरित पोहोचविण्याबाबतही गटशिक्षण अधिकाऱ्यांना कळविण्यात आले आहे.

# मुलींना रोडरोमियोंकडून होणाऱ्या त्रासाबद्दल शिवसेनेच्या वतीने निवेदन

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** माळशिरस तालुक्यामध्ये शिक्षण संस्थेचे फार मोठ्या प्रमाणात जाळे आहे. प्रत्येक मोठ्या गावातील शाळांना भेटी देत असताना किंवा त्या ठिकाणाहून वावरत असताना शाळा भरतेवेळी व सुटताना रोड रोमियोंचा मुलींना होणारा त्रास अनेक वेळा निदर्शनास आल्याने त्या शाळेकरी मुलींना होणाऱ्या त्रासाचा बंदोबस्त करणेसाठी मुख्याध्यापकांची तात्काळ बैठक लावण्याचे निवेदन ओबीसीचे शिवसेना जिल्हाप्रमुख राजकुमार हिवरकर पाटील यांनी गटशिक्षणाधिकारी सुषमा महामुनी यांना निवेदन देण्यात आले आहे.



अनेक मुलींना शिक्षण घेणेसाठी खेड्यापाडयातून शहरांमध्ये येताना शाळेच्या बाहेर, बस स्थानकावर, शाळा सुटल्यानंतर घरापर्यंत पोहोचेपर्यंत काही रोड रोमियो मोटरसायकल वरून कर्णकर्कश्य आवाज करीत मुलींच्या मागे पुढे फिरण्याच्या महिला पालकांच्या तक्रारीवरून दि.५ एप्रिल २०२४ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने गटशिक्षणाधिकारी उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस ठाण्याचे प्रमुख, निर्भया पथकातील सर्व अधिकारी, तालुक्यातील सर्व मुख्याध्यापकां समवेत बैठक आयोजित केली होती. त्याच धर्तीवर सद्यस्थितीत रोडरोमीयोंचा त्रास दिसून येत असल्यामुळे अशा रोड रोमियोंचा त्रास थांबविण्यासाठी तात्काळ बैठकीचे आयोजन करण्याचे निवेदन शिवसेनेच्या वतीने देण्यात आले. सदरील निवेदनाच्या प्रती गटविकास अधिकारी रघुनाथ पांढरे, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष वाळके यांना देण्यात आल्या आहेत. यावेळी शिवसेनेचे महाळुंग शहर प्रमुख रोहित रेणके, नातेपुते दक्षिण शहरप्रमुख दादा वाघमारे, तालुका मीडिया प्रमुख फरीद शेख, दहिगाव शाखाप्रमुख दत्ता बोडरे, प्रतीक ओव्हाळ, दत्तनगर शाखाप्रमुख संजय खुसपे ग्रा. पं. सदस्य दहिगाव, दत्तनगर शाखाप्रमुख सोनू वाघ आदी शिवसैनिक उपस्थित होते.

# शिक्षक व शिक्षकेतर सेवक सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी देशमुख

**अनगर (कटूसत्य वृत्त):-** राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष व मोहोळ तालुक्याचे माजी आमदार राजन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व बिनविरोध परंपरा असलेली मोहोळ तालुका माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित मोहोळ या पतसंस्थेच्या नूतन चेअरमन पदी संदीप दत्तात्रय देशमुख सहशिक्षक शिवाजी हायस्कूल पाटकुल यांची निवड झाल्याबद्दल माजी आमदार राजन पाटील यांच्या हस्ते संदीप देशमुख यांचा अनगर येथे सन्मान करण्यात आला. यावेळी पाटील म्हणाले की या संस्थेला मोठी परंपरा आहे सर्व व्यवहार पारदर्शक आहेत संस्थेच्या



व सभासदांच्या हितासाठी चांगले निर्णय घ्या असे म्हणून त्यांनी नूतन चेअरमन यांना शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी प्राचार्य चंद्रकांत ढोले, माजी प्राचार्य श्रीधर उन्हाळे, आयुब इनामदार, प्राचार्य बशीर बागवान, प्राचार्य सुधीर गायकवाड, माझी चेअरमन शरद म्हमाने, मुख्याध्यापक दत्तात्रय गावडे, रवी पाचपुंड, संस्थेचे संचालक कालिदास गावडे,आबाराव गावडे, सचिव विलास पासले, प्राध्यापक संभाजी चव्हाण, माधव खरात, नाईकनवरे आदी मान्यवर उपस्थित होते.


# पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर

फोन क्र. (०२१८६) २२३२५३,२२३०१३ फॅक्स क्र.(०२१८६)२२३००६

ई मेलः- comcpandharpur@gmail.com

"झाडू संताचे मार्ग करू पंढरीचा स्वर्ग"

## पंढरपूर नगर परिषद पंढरपूर
## ता:- पंढरपुर जि:- सोलापुर ४१३३०४

**विभागाचे नाव :- दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (DAY-NULM)**

पंढरपूर शहरामधील सर्व महिला स्वयंसहायता बचत गट यांना कळविण्यात येते कि, सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी खाली नमूद केलेप्रमाणे महिला स्वयंसहायता बचत गटाच्या मार्फत सुलभ शौचालय देखभाल व्यवस्थापन करणे व नगर परिषद मधील विविध विभागामधील अवश्यकतेनुसार विविध बिल वाटप काम करणे आहेत. तरी इच्छुक, अनुभवी महिला स्वयंसहायता बचत गट यांचेकडून खालील कामासाठी दरपत्रक मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे स्वरूप व साहित्याचा तपशील | अंदाजे परिणाम |
|---|---|---|
| १ | सुलभ शौचालय देखभाल व्यवस्थापन करणे. | आवश्यकतेनुसार |
| २ | पंढरपूर नगर परिषद मधील विविध विभागामधील अवश्यकतेनुसार विविध बिल वाटप काम करणे. | आवश्यकतेनुसार |

शर्ती व अटी

१) दरपत्रक स्विकारण्याची मुदत दि.२६/०९/२०२५ पासून दि ०७/१०/२०२५ अखेर कार्यालयीन कामकाजा दिवशी कार्यालयीन वेळेत दु. ४:०० वाजेपर्यंत राहील.

२.) एक किंवा सर्व दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

३.) दरपत्रकबाबत अधिक माहिती दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (DAY-NULM) विभागात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत मिळेल.

४.) मंजूर मक्तेदाराने योग्य त्या रक्कमेचे स्टॅम्प पेपरवर नोंदणीकृत करारपत्र करून द्यावे लागेल.

सही/-
मुख्याधिकारी तथा
शहर प्रकल्प अधिकारी
पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर